# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 35 ) 1st April 2010 ( No : 03

# *A G E N D A*

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION to be held at 12.00 noon on *SUNDAY, the***

## *16 th May, 2010 at* Shivshakti Arts & Commerce College, Babhulgaon ( Dist. Yavatmal )

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers' Association to be held at 12.00 noon on Sunday, the 16th May 2010 at Shivshakti Arts & Commerce College, Babhulgaon ( Dist. Yavatmal ) is as follows :-

### ITEM NO. 516 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**TO CONFIRM** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 13th December, 2009 at Yeshwant Mahavidyalaya, WARDHA.

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 221 to 226 of 2009 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the* 13th December, 2009 at Yeshwant Mahavidyalaya, WARDHA. *vide No.CIM/28 Dated 25th December, 2009 published on page 227 of 2009) NUTA Bulletin. No correction was received.*

**राज्यातील कृषि विद्यापीठ शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करणेची कार्यवाही**

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन , २०१०*

*गुरुवार, दिनांक २५ मार्च, २०१०*

* **२८३३ श्री. विक्रम काळे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री. सतीश चव्हाण, श्री. संजय पाटील** : सन्माननीय **कृषी मंत्री पुढील** गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि विद्यापीठातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी अद्याप लागू केलेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि विद्यापीठातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१), (२) व (३) राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील व संलग्न कृषि महाविद्यालये, अनुदानित कृषि महाविद्यालये यामधील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १८ मार्च, २०१० रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

******

### ITEM NO. 517 :
### *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**TO CONSIDER AND APPROVE** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2009.

***Notes :*** *(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.02 of 2009) and is to be placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report is circulated* in this *NUTA Bulletin on page 31 to 36*

*(iii) Dr. E.H.Kathale, Secretary will present the Annual Report on behalf of the Executive Committee.*

### ITEM NO. 518 :
### *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**TO APPROVE** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2010.

***Notes :*** *(i) Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, will present the Budget on behalf of the Executive Committee. (ii) The copy of the Budget is circulated on page No. 32 of 2010 NUTA Bulletin.*

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**MEETING NOTICE : 2**

**Date : 10.04.2010**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/ resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**at 12.00 Noon on, Sunday, the**

***16 th May, 2010 at***

**Shivshakti Arts & Commerce College,**

**Babhulgaon ( Dist. Yavatmal )**

# नेट सेट अर्हताप्राप्त नसलेल्या अधिव्याख्यात्यांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : सोमवार, दिनांक २१ डिसेंबर, २००९ : चौथे अधिवेशन , २००९*

**श्री.चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे**,वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना

**श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री)** : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "नेट सेट अर्हताप्राप्त नसलेल्या अधिव्याख्यात्यांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविणे" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे निवेदन**

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १९.९.१९९१ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार विद्यापीठे व अशासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदावरील नियुक्ती करीता किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. त्यानुसार उमेदवाराने चांगल्या शैक्षणिक अहवालासह संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किमान ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण केली असली पाहिजे. याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाची राष्ट्रीय पात्रता परीक्षा वा विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिस्विकृती दिलेली राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (नेट/सेट) उत्तीर्ण केली असली पाहिजे. दिनांक १९.९.१९९१ नंतर अधिव्याख्याता पदावर नियुक्ती दिल्या जाणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने वरील शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियम १९९१ अनुसार बंधनकारक आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या निर्णयानंतर राज्य शासनाने दि. २३.१०.१९९२ रोजी शासन निर्णय निर्गमित करून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश निर्गमित केले.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.४.२००० च्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेले विनियम २००० मध्ये सुद्धा वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता/पात्रतेची अट अंतर्भूत करून सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात आले आहे की, यापुढे दिनांक ४.४.२००० नंतर राज्यातील महाविद्यालयात/विद्यापीठात अधिव्याख्याता पदावर बिगर अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या कोणत्याही परिस्थितीत करू नये. अशा नियुक्त्या केल्यास त्यास मान्यता व अनुदान दिले जाणार नाही. तसेच दि. ४.४.२००० पासून अशा नियुक्त्या दिल्या असल्यास त्या तात्काळ रद्द कराव्यात.

मा. उच्च न्यायालयाने या.क्र. ५७८२ मध्ये दिनांक १८.४.२००२ रोजी दिलेल्या आदेशान्वये नेट/सेट परीक्षेतून सूट दिली नसून ज्या अधिव्याख्यात्यांनी नेट/सेट अर्हता प्राप्त केली नसेल अशा अधिव्याख्यात्यांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विचारार्थ पाठविण्यात यावेत, असे आदेश दिले. **विद्यापीठांनी आतापर्यंत एकूण ८३४२ अधिव्याख्यात्यांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विचारार्थ पाठविले आहेत. सदर प्रकरणांचा पाठपुरावा करण्यासाठी समिती गठीत करण्याचे आदेश संचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात आलेले आहेत.**

**श्री.चंद्रकांत पाटील** : सभापती महोदय, नियम ९३ च्या सूचनेच्या निवेदनात माननीय मंत्रिमहोदयांनी असे म्हटलेले आहे की, विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील १९९१ पासून जवळजवळ दहा हजार प्राध्यापक असे आहेत की त्यांनी नेट सेटची परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही. त्यामुळे राज्यात जवळजवळ ४४ दिवस संप सुरु होता.त्या संपाच्या वेळी त्यांना असे उत्तर देण्यात आले होते की , "उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे आम्ही एक समिती नेमू." ऑगस्ट महिन्यापासून आतापर्यंत ही समिती का नेमण्यात आलेली नाही? त्याचबरोबर या समितीने पाठपुरावा करुनही यासंबंधी समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर या दहा हजार प्राध्यापकांच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्री.राजेश टोपे** : सभापती महोदय, एमफुक्टो संघटनेने या संदर्भात संप पुकारला होता व उच्च शिक्षण विभागाने या समितीच्या नेमणुकीच्या संदर्भात त्या संघटनेला दिनांक २६.११.२००९ रोजी एक पत्र पाठविले होते आणि संघटनेला विनंती करण्यात आली होती की, संघटनेचे दोन प्रतिनिधी या समितीवर घेण्याचा निर्णय झालेला होता, ते दोन प्रतिनिधी लवकर द्यावेत. एमफुक्टो संघटनेने त्यांचे दोन प्रतिनिधी नेमावयाचे असून त्यांनी दोन प्रतिनिधी पाठवावेत यासाठी शासन प्रतीक्षेत आहे. त्यांनी दोन प्रतिनिधी पाठविल्यानंतर दहा दिवसात ही समिती गठीत करण्यात येईल.

**उपसभापती** : नियम ९३ च्या निवेदनावर सन्माननीय सदस्यांना एकच प्रश्न विचारता येईल परंतु सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी माझ्याकडे येऊन विनंती केलेली असल्यामुळे मी त्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देत आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, समिती नेमण्यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते समाधानकारक आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे. शासनाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला दिनांक २४ जुलै २००९ रोजी असे लिहून दिले होते की, "**राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केन्द्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील**" त्यानंतर दिनांक ३१.७.२००९ रोजी पुन्हा असे लिहून दिले की, "**आवश्यकता पडल्यास पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील.**" **मात्र २४ ऑगस्टला एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने तेथे जाऊन उलटे पत्र दिले.** माझे या बाबतीत एकच म्हणणे आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी मेहनत घेऊन संपूर्ण प्रश्न समजावून घेतला म्हणून तो प्रश्न एका मर्यादेपर्यंत सुटला . १९९१ ते १९९९ या काळातील शिक्षकांच्यावर अनेक निरनिराळे एका मागून एक अन्याय झाले होते. त्यातील काही अन्याय या सभागृहात दूर झाले होते. दिनांक ३१ मार्च १९९४ ला त्यांना काढून टाकण्यात येईल अशी ऑर्डर काढली होती ती रद्द करण्यात आली होती, दिनांक ३१ मार्च १९९५ ला त्यांना काढून टाकू अशी ऑर्डर काढली होती ती सुध्दा रद्द करण्यात आली होती, त्यानंतर नेटसेट केले नाही तर दिनांक ३१ मार्च १९९६ ला काढून टाकू अशी पुन्हा ऑर्डर काढली होती ती नंतर रद्द करण्यात आली होती. काढून टाकण्याची अट काढून टाकण्यात येत आहे अशी ऑर्डर त्यानंतर काढली. डिसेंबर १९९५ मध्ये त्यांना इन्क्रिमेन्ट देणार नाही असा आदेश काढला तो नंतर मागे घेण्यात आला, त्यांना ॲडहॉक समजावे असा आदेश काढण्यात आला तो नंतर मागे घेण्यात आला. काढून टाका ही अट काढण्यात येत आहे, **अशाच इतरही अटी ज्या 'काढून टाका' स्वरूपाच्या होत्या त्या काढून टाकण्यात आल्या आहेत. इतकेच नव्हे तर इन्क्रिमेंट देणार नाही असे म्हटले होते तेही रद्द करावे लागले.** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी साऱ्या गोष्टी गेल्या काही दिवसात ऐकून घेतल्या आहेत. दोन्ही बाजू समजून घेतल्या आहेत. तेव्हा आता या लोकांना न्याय देण्यासाठी म्हणून मंत्री महोदयांनी स्वतः विद्यापीठ अनुदान आयोगाकडे जाऊन ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाला समजावून सांगितली पाहिजे. सभापती महोदय, या निवेदनामध्ये अनेक अर्धसत्य गोष्टी आहेत,काही चुकीची माहिती आहे. पण मी त्यावर बोलणार नाही. मी या निमित्ताने एकच प्रश्न विचारू इच्छितो की, **जानेवारी महिन्यात माननीय मंत्री महोदयांनी स्वतः विद्यापीठ अनुदान आयोगाकडे, त्यांच्या अध्यक्षाकडे जाऊन या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा तसा ते करतील काय ?**

**श्री. राजेश टोपे** : सभापती महोदय, ७ हजार अधिव्याख्यात्यांचा हा प्रश्न आहे आणि **म्हणूनच या संदर्भात निश्चितपणे समितीदेखील गठित केली जाईल, तसेच सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना बरोबर घेऊन, कारण ते देखील एमफुक्टोचे एक ज्येष्ठ सदस्य आहेत**, जानेवारी महिन्यात, **... या विद्यापीठ अनुदान आयोगाचे श्री.थोरात नावाचे जे चेअरमन आहेत त्यांनी माझ्या घरी येऊन या विषयी सगळी काही चर्चा आम्ही केली आहे.** तेव्हा या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने युजीसी आणि राज्य सरकार लवकरात लवकर प्रयत्न करील आणि सन्माननीय सदस्य म्हणतात **त्याप्रमाणे आमच्या अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन, सन्माननीय सदस्यांच्यासह हा प्रश्न निश्चितपणे आम्ही सोडवू.**

*****

## ITEM NO. 519 :

## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**TO CONSIDER AND APPROVE** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2010 namely :-

"**C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas'' Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2009**"

***Notes :***

*(i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association."*

*(ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 04 of 2010) which is now placed before the General Body for its approval.*

*(iii) Dr. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee, will move the resolution.*

**विषय क्रमांक ५२० :**

***'बुक्टु'च्या वार्षिक अहवालातील परिच्छेद ४ मधिल मजकुराशी सहमती व्यक्त करणे***

कार्यकारी मंडळाच्या वतीने डॉ. प्रविण रघुवंशी हे पुढील प्रस्ताव मांडतील. :-

Bombay University & College Teachers' Union "बुक्टु"च्या सन २००९ च्या मसुदा वार्षिक (कार्यकारिणीने सम्मत केलेल्या) अहवालातील परिच्छेद ४ (४.१ ते ४.६) मध्ये व्यक्त करण्यात आलेल्या पुढील मजकुराशी ही सभा सहमती व्यक्त करित आहे. :-

4.1 As the members are fully aware that in Maharashtra we have had to go through a long and arduous struggle during the Union Year 2009 which took the form of indefinite cease work from 14th July and lasted 44 long days ending on 27th August 2009. That the agitation came to an end with an agreement between the Government of Maharashtra and the MFUCTO recorded in the form of Minutes is a matter of great pride and rejoicing because this has given to all the University and College teachers the new scales of pay of

(i) Rs. 15600-39100 + AGP 6000

(ii) Rs. 15600-39100 + AGP 7000

(iii) Rs. 15600-39100 + AGP 8000

(iv) Rs. 37400-67000 + AGP 9000

with 3 percent of their basic pay as their annual increments. Teachers will also get new designations as Lecturer, Assistant Professor, Associate Professor and Professor.

4.2 Members will also agree that this could not have been achieved in full and in time without the indefinite cease work. There was uncertainty in the State with the coalition government of Congress and NCP headed by Shri. Ashok Chavan in its last leg before the elections which would have to take place in any case prior to October 2009. The count-down for the election would have to begin sometime in the second week of August 2009. MFUCTO at its regular meeting of the Executive Committee held on 20th April 2009 adopted a detailed Resolution unanimously in which apart from setting out the issues involved, the Government was called upon to issue the GR in implementation of the Sixth Pay Commission recommended scales of Pay for university and college teachers in the State. The Resolution Made it clear that in case the government failed to carry out its obligation in that respect, MFCTO would be compelled to go ahead with its Action Programme which would start with serving of cease work notice to the Government on 20th and 21st April 2009 followed by service of Notices holding Dharna outside the JDEs' offices throughout the State of Maharashtra. This was to be followed by the one day mass casual leave on 6th July 2009 and then the indefinite ceasework from 14th July 2009. During the indefinite ceasework itself, several demonstrative programmes throughout the State in all the University areas were un-

### *महाराष्ट्र शासन : शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)*

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

***फोन नं. ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. ०२०/२६१११९५३***

*क्र. उशिसं-२००९/एमफुक्टो/मवि-१-६५८६ : दिनांक १८.१.२०१०*

**आदेश**

एमफुक्टो संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत दिनांक २६.८.२००९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याबाबत व सेवा नियमित करण्याबाबतचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त करुन घेण्याकरीता पाठपुरावा करण्यासाठी शासनाचे दोन प्रतिनिधी व एमफुक्टो संघटनेचे दोन प्रतिनिधी, अशा चार प्रतिनिधींची समिती गठीत करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

**त्यानुसार शासनाचे प्रतिनिधी म्हणून**

१. डॉ. आर.आर. देशपांडे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुख्यालय, पुणे

२. श्री.बी.बी.कदम, सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

**तसेच संघटनेचे प्रतिनिधी म्हणून**

१. प्राध्यापक बी.टी.देशमुख, आमदार, नं. ३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाशेजारी, अमरावती ४४४ ६०४

२. प्राध्यापक सी.आर.सदाशिवन, अध्यक्ष, एमफुक्टो, अे/२०७ आर.के.गोकुळधाम,एस.व्ही.रोड, बोरिवली (प), मुंबई ४०० ०९२ यांची समिती गठित करण्यात येत आहे.

**वरील सदस्यांनी नेट/सेट बाबतचे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा करावा व संबंधित प्रश्न मार्गी लावण्याबाबत प्रयत्न करावेत.**

**(डॉ.आर.व्ही.किर्दक)**

शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत : (१) डॉ. आर.आर. देशपांडे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुख्यालय, पुणे (२) श्री.बी.बी.कदम, सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर. (३) प्राध्यापक बी.टी.देशमुख, आमदार, नं. ३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाशेजारी, अमरावती ४४४ ६०४ (४) प्राध्यापक सी.आर.सदाशिवन, अध्यक्ष, एमफुक्टो, अे/२०५ आर.के.गोकुळधाम,एस.व्ही.रोड, बोरिवली (प), मुंबई ४०० ०९२ (५) मा. प्रधान सचिव , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

** AF:P 29 **

dertaken. The participation of the teaching community in these demonstrations indicated that the teaches were in mood to fight to the finish. While we cannot forget our indefinite strike at the All India level in 1987, the State level indefinite strike in December 1988 and January 1989 and the huge indefinite strike in 1998 that had given the academic community good status, high dignity and decent pay scales, the present 2009 indefinite cease work must be regarded as on of the strongest actions of the teachers in Maharashtra to protect their economic, academic and other interest flowing from the Sixth Pay Commission recommendations as also of the UGC Chhada Pay Review Committee.

4.3 Was the indefinite ceasework prolonged indefinitely? One of the severest criticisms on the MFUCTO during the strike and even after the strike has been that the indefinite ceasework was prolonged to 44 days unnecessarily whereas it could have been ended much earlier had MFUCTO been a little flexible. If we analyze the quarters from where it emerged, it will be seen that this was from those who were not totally with the cease work agitation and from those who did not participate in the movement and who were facing embarrassment each day of the ceasework when their colleagues were on the ceasework. It also came from those who looked at the indefinite ceasework movement as a 'mechanical action' to extract some assurances from the Government to withdraw the movement and to go back to the teachers with heroic statements. It must be remembered that MFUCTO was not at all interested in prolonging the movement and was prepared to withdraw the movement even as early as on 18th July 2009 when it appeared that the 16th July

## अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्याची मागणी

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन , २०१०*

*गुरुवार, दिनांक २५ मार्च, २०१०*

**(१७) * २६०० प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर २००९ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या असून त्यानंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण मंडळाने (AICTE) दिनांक २२ जानेवारी २०१० रोजी याबाबतची अधिसूचना निर्गमित केलेली आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

(२) असल्यास, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्यात मंत्रालयातील, मुख्य सचिवांच्या दालनात २६ ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळया १० मुद्यांवर मतैक्य झाले व अशा मुद्यांचे इतिवृत्त त्याच दिवशी उभयपक्षी स्वाक्षरीत झाले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इतिवृत्तात नमुद असलेल्या मुद्दा क्रमांक ९ प्रमाणे उच्च शिक्षण विभागातील महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे तंत्रशिक्षण विभागातील शिक्षकांना अजूनही सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू न होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच प्रश्न भाग २ मध्ये नमूद केलेले इतिवृत्त व प्रश्न भाग १ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे तसेच उच्च शिक्षण विभागाचा १२ ऑगस्ट २००९ चा शासननिर्णय लक्षात आणून देवून याबाबत विभागाने तत्परतेने कारवाई करावी अशी मागणी करणारे एक निवेदन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) अध्यक्षांनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक २५ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यासुमारास सादर केले हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्या संदर्भात काय कारवाई करण्यात आलेली आहे,

(६) कारवाई करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे** : (१) अशंतः खरे आहे.

दिनांक ७ ऑक्टोबर, २००९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाने अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकीय पदांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस आवश्यक सूचना देऊन तसे सर्व राज्यांना कळविले आहे. **परंतु मानव संसाधन विभागाच्या उपरोक्त पत्रानुसार आवश्यक अधिसूचना परिषदेकडून अद्यापि निर्गमित झालेली नाही.** दिनांक २२ जानेवारी, २०१० रोजी परिषदेमार्फत अधिसूचनेचे प्रारुप आवश्यक सूचनांसाठी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(२) होय.

(३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकीय पदांना **सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत आवश्यक अधिसूचना निर्गमित केली नसल्याने तंत्रशिक्षण विभागातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करता येत नाहीत.**

(४) होय.

(५) उपरोक्त प्रश्न ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर प्रकरणी सध्या कार्यवाही करणे शक्य नाही. सदर प्रकरणी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नवी दिल्ली येथील कार्यालयाशी संपर्क साधला असता, **या प्रकरणी आवश्यक अधिसूचना पुढील १५ ते २० दिवसात निर्गमित होणार असल्याचे समजले आहे.**

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन , २०१०*

*शुक्रवार, दिनांक १९ मार्च, २०१०*

**(५५) * २५९९ प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री. विक्रम काळे** : सन्माननीय सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा.उच्च शिक्षण मंत्री व मा.मुख्य सचिव यांच्यात मंत्रालयातील, मा.मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या १० मुद्यांवर मतैक्य झाले व अशा मुद्यांचे इतिवृत्त त्याच दिवशी उभयपक्षी स्वाक्षरीत झाले, हे खरे आहे काय,

(२) सदरहू इतिवृत्तात नमुद असलेल्या मुद्दा क्रमांक ८ प्रमाणे मा.उच्च शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या विनंतीनुसार उच्च शिक्षण विभागातील महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे सामाजिक न्याय विभागातील शिक्षकांना अजूनही सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू न होण्याची कारणे काय आहेत,

(३) प्रश्न भाग १ मध्ये नमूद केलेले इतिवृत्त व १२ ऑगस्ट, २००९ चा उच्च शिक्षण विभागाचा शासननिर्णय लक्षात आणून देवून याबाबत सामाजिक न्याय विभागाने तत्परतेने कारवाई करावी अशी मागणी करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (NUTA) उपाध्यक्षांनी मा.सामाजिक न्यायमंत्री यांना दिनांक १० सप्टेंबर, २००९ रोजी किंवा त्यादरम्यान सादर केले हे खरे आहे काय,

(४) खरे असल्यास, त्या संदर्भात काय कारवाई करण्यात आलेली आहे,

(५) कारवाई करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवाजीराव मोघे** : (१) नाही. सदर बैठक मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्याकडे झाली.

(२),(३) व (४) **सदर बैठकीचे इतिवृत्त अथवा मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचे पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही.** मास्वे संघटनेकडून निवेदन प्राप्त झाले असून त्याप्रमाणे संचालकांकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

2009 negotiations with the Minister were fruitful. However, on 18th July 2009 the negotiations had to be given up due to the volte face by the Education Secretary who had a hidden agenda up his sleeve namely to deny the post and scale of Professors to teachers in the colleges on the one side and not to give the Rs. 37400-6700+AGP 9000 scale of pay to teachers who had completed three years in the selection grade. Had MFUCTO ended the indefinite cease work early on the promise that the GR was being issued and that the recommendations of the sixth pay commission would be brought into effect soon, MFUCTO would have committed nothing less than a hara-kiri as on Organization and put thousands of our very senior teachers permanently into loss of the prestigious scale of Rs. 37400-67000+AGP 9000. This was because MFUCTO was not aware of the hidden agenda of the Education Secretary at the initial stage and only when the indefinite cease work continued that the said shocking fact came to surface. MFUCTO therefore insisted that the contents of the GR must first be made public and MFUCTO should have an opportunity to correct if there were anything that was a local product invented by the bureaucracy in Maharashtra different from the UGC recommendations. That is how even after the GR was issued, corrections were suggested as pre-condition for withdrawal of the indefinite cease work and the Government had to accept the same and agree to issue another GR for effecting the corrections.

4.4 **Was the indefinite cease work prolonged for the sake of Non-NET / SET teachers even when**

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या चर्चेअंती १० मुद्यांवर मतैक्य

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०१० : पहिले अधिवेशन , २०१०*

(७) * २५९८ **प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्यात मंत्रालयातील,**मा.मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या १० मुद्यांवर मतैक्य झाले व अशा मुद्यांचे इतिवृत्त त्याच दिवशी उभयपक्षी स्वाक्षरीत झाले हे खरे आहे काय,**

(२) असल्यास, या १० मुद्यांवर आतापावेतो शासनातर्फे मुद्देनिहाय काय कारवाई करण्यात आलेली आहे,

(३) काही मुद्यांवर अजूनही कारवाई झालेली नसल्यास, ते मुद्दे कोणते,

(४) प्रश्न भाग (३) मधील मुद्यांवर कारवाई न होण्याची कारणे काय आहेत?

**प्रा.वर्षा गायकवाड, राजेश टोपे यांच्याकरिता** : (१) होय.

(२) दिनांक २६ ऑगस्ट, २००९ च्या इतिवृत्तातील **मुद्यांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा मुद्देनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :-**

**मुद्दा क्र.१** :- केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य न मिळाल्यास थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देणार आहे. परंतु केंद्र शासनाने अद्याप तसा निर्णय घेतला नसल्यामुळे राज्य शासनाकडून सद्यःस्थितीत याबाबत कोणतेही आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

**मुद्दा क्र. २, ३ व ४** च्या अनुषंगाने दि. १९.११.२००९ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

**मुद्दा क्र.५** :- समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्र.६** :- च्या अनुषंगाने दि. २९.८.२००९ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

**मुद्दा क्र.७** :- च्या अनुषंगाने दि. १ सप्टेंबर, २००९ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

**मुद्दा क्र.८** :- च्या अनुषंगाने मा.मंत्री, सामाजिक न्याय यांना पत्र पाठविले आहे.

**मुद्दा क्र.९** :- च्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

**मुद्दा क्र.१०** :- च्या अनुषंगाने दि. ७ सप्टेंबर, २००९ रोजी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, या प्रश्नातील एकूण १० मुद्यांपैकी क्रमांक नऊ व पहिला मुद्दा वगळता उर्वरित आठ मुद्यांबाबत समाधानकारक कारवाई करण्यात आलेली आहे. मुद्दा क्रमांक ९ च्या बाबतीत मी मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, दिनांक १३.३.२०१० रोजी भारत सरकारचे फायनल गॅझेट नोटिफिकेशन इंजिनिअरींग कॉलेजच्या शिक्षकांच्या बाबतीत निर्गमित झाले आहे. त्याची प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी दिनांक २३.३.२०१० रोजीच्या निवेदनाद्वारे शासनाकडे सादर केलेली आहे. हे फायनल नोटिफिकेशन आता केंद्र शासनाने निर्गमित केलेले असल्यामुळे याबाबतचा राज्य शासनाचा शासन निर्णय केव्हा निर्गमित केला जाणार आहे ?

**प्रा.वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, **दोन महिन्याच्या आत लागू होईल. एआयसीटीईने ते लागू केलेले आहे. त्यानुसार तंत्रशिक्षण विभागाला सुध्दा लागू केले जाईल.**

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, कार्यवृत्तातील पहिल्या मुद्याबाबत एक चांगली गोष्ट झाली आहे ती अशी की, महाराष्ट्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाचा व केंद्र शासनाचा हा निर्णय जशाचा तसा लागू केल्यामुळे ८० टक्के मदत केंद्र शासनाकडून नक्की मिळणार आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना भत्ते दिले आहेत. त्यामुळे मूळ योजनेला बाधा येत नाही असे केंद्र शासनाकडून मध्य प्रदेश हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट सादर केले आहे. आपल्याकडे त्याची प्रत असेल, नसेल तर ती आम्ही आपणास द्यावयास तयार आहोत. माझे म्हणणे असे आहे की, केन्द्र शासनाकडून ८० टक्के मदत मिळत असताना त्यासंदर्भात राज्य शासनाकडून क्लेम जावयास पाहिजे. हा क्लेम राज्य शासनाकडून केन्द्र शासनाला गेला आहे काय ? तो गेला नसेल तर, राज्य शासन किती तारखेच्या आत तो क्लेम केन्द्र शासनाकडे पाठविणार आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड** : आम्ही दिनांक ६ जानेवारी २०१० ला केन्द्र शासनाचा जो भाग आहे त्यासंदर्भात पत्र पाठविलेले आहे. तसेच दोन वेळा रिमाइंडर देखील पाठविलेली आहेत. **८० टक्के क्लेम आपल्याला मिळावयास पाहिजे. त्यासाठी वारंवार मागणी केलेली आहे.**

**प्रा. बी.टी. देशमुख** : केन्द्र शासनाकडून आलेले पत्र अतिशय स्पष्ट आहे. राज्य शासनाने प्रत्यक्ष अंमलबजावणी करुन आपला क्लेम दाखल केला पाहिजे, असे पत्रामध्ये म्हटलेले आहे. ते पत्र वाचून दाखविण्यामध्ये वेळ जाईल. माझे म्हणणे असे आहे की, थकबाकीच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी मागच्या वेळी सांगितले होते की १५ जानेवारी पर्यन्त आम्ही कार्यवाही करु. परंतु ती झाली नाही आणि आजपर्यन्तही ती कार्यवाही झालेली नाही हे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून स्पष्ट झालेले आहे.**८० टक्के थकबाकीसाठी क्लेम दाखल झाल्याशिवाय पैसे कसे मिळतील ? जवळ जवळ १९०० कोटीच्यावर निधी आपल्याला केन्द्र शासनाकडून मिळणार आहे.** आपला क्लेम दाखल न होणे ही गोष्ट बरोबर नाही. थकबाकीच्या संदर्भातील ८० टक्केचा क्लेम आपण केन्द्र शासनाला केव्हा सादर केला ?

**प्रा. वर्षा गायकवाड** : ६ जानेवारी २०१०ला क्लेम केलेला आहे.

**प्रा. बी.टी.देशमुख** : किती कोटीचा क्लेम केलेला आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड** : १९०८.१३४ कोटीचा.... **जवळपास १९०० कोटीचा क्लेम केलेला आहे.**

******

**the government was magnanimously prepared to implement the entire sixth pay commission recommendations in full by issuing the GR?** This was another common statement that was heard and highlighted by the press and our foes. This was another lie aimed at weakening the movement on the one side dividing the teachers on the other. MFUCTO's stand was forthright that teachers appointed between 19-9-1991 and 11-12-1999 (4-4-2000) were not required to clear NET/SET because they were not brought under NET/SET by the Government through the available legal machinery. Calling upon them to clear NET/SET was in introduce the new qualification condition on them retrospectively which was already rejected by the Hon'ble Supreme Court. MFUCTO therefore worked in the beginning of the cease work itself to get the government to issue a GR that would completely resolve the problem without any hang over of the past failures. MFUCTO also knew that through the Minister was considering the proposal favorably, Education Secretary was systematically working to prevent this from happening. The bunch of letters from the bureaucracy in Maharashtra to the UGC during the indefinite cease work is enough to prove this point. By this even the grant of exemption by the UGC for teachers in Maharashtra which was fast progressing was brought to a halt. The government came out with the proposal of the 4 member committee from Maharashtra with two members from the MFUCTO being sent to the UGC for getting the exemption cased speeded up and without giving up the MFUCTO's stand, this has been accepted as a way out to resolve the long pending problems of the non-NET/SET teachers. This was clear even as early as 3rd August 2009 and the cease work continued beyond that only to ensure that the UGC pay-scales in tact were implemented by the government.

4.5 The Minister went on saying from 16th July 2009 that the GR is coming. It was like the proverbial tiger that was to come. It never came for a month thereafter. When did it come? It is dated 12th August 2009 but the first copy in the website of the government appeared late in the evening on 17th August 2009. In the GR the scales were cleared including the Rs. 37400-67000+AGP 9000. Till then that scale of pay was not also fully settled. Like the proverbial tiger the GR would have swallowed our non-NET/SET teachers dividing the teachers' movement in Maharashtra vertically and irreconcilably. There were issues that required to be cleared by amendments. One of that was the use of the words **'those lawfully recruited'**. At the meeting with the Hon'ble Chief Minister held on 20th August 2009, when the CM asked the MFUCTO whether they were satisfied with the GR the answer was teachers were not satisfied. The reason being the addition of the words **'those lawfully recruited'** by which the government was preparing to completely reject the Sixth Pay Commission recommended scales of pay to non-NET/SET teachers. On the CM enquiring with the Education Secretary about the said move, the answer was that they would not be given the six pay commission scales because they were not lawfully appointed. The CM asked, were such teachers in service; how long, whether they were getting the fifth pay commission scale of pay to which the answer from the Education Secretary was that they were working for many years and that they were getting the 'bottom-most' scale of the fifth pay commission. The CM therefore ruled that they were automatically entitled to the 'bottom-most' scale in the sixth pay commission. MFUCTO had won a major battle by this but even on 26th August 2009 when the negotiations were on with the drafting of the Minutes of agreement, Education Secretary insisted that non-NET/SET teachers should not be given the pay revision. It was the Minister's stand and of the Chief Secretary that prevailed to ensure that non-NET/SET teachers were also entitled to get the pay scales and that the words "those lawfully recruited" should be deleted from the GR.

4.6 It is easier said that the ceasework could have ended early if the MFUCTO was flexible and honest. **The fact that we must not forget is that no one is a friend of the striking employees and public opinion can be easily manufactured against the strikers as is always done using the press and the mass media.** Only those leaders who were in the thick of negotiations were able to appreciate that the struggle would not end soon and that the teachers would have to go through the process of repression. MFUCTO also realized that it was the war of attrition that the Government was letting loose. That the government advertised in the newspapers continuously spending lakhs of rupees giving false information to the teachers and the general public was an exercise in that direction. The Government was hoping that due to prolongation of the indefinite cease work, MFUCTO will be the one to blink first. That it did not happen that way is history and it is entirely due to the MFUCTO's strong stand in the negotiations and its democratic structure of taking decisions collectively. At the end of it all, unity of the teachers has been retained in fully and the teacher's movement has been strengthened. Our enemies in the teaching community and outside have also been shown their place.

*****

# सावित्रीबाई फुले - फातिमा शेख : पुरस्कार २०१०

**शिक्षक भारती**

*शिक्षणाच्या हक्कासाठी ! शिक्षकांच्या सन्मानासाठी !*

**प्रा.बी.टी.देशमुख**

